महाराष्ट्र वन विभाग
"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन
वनविभाग

उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर
मु.पो.तालुका जुन्नर, दादोजी कोंडदेववाडा,
जि. पुणे - 410502.

दूरध्वनी क्र. 02132 222063
Email ID: junnarforestdn@gmail.com / dycfjunnar@mahaforest.gov.in

क्रमांक-ब/कक्ष-४.२/जमीन/ 29 /२०२०-२१, दिनांक 19 /०६/२०२०

**प्रती,**

**सहाय्यक अभियंता, श्रेणी-१,**
**सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग,**
**पुणे- ४११ ००१.**

विषय : वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कलम-२ प्रमाणे सन १९८० पूर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदिकरणास परवानगी मिळणेबाबत. क्षेत्र ०.०९ हेक्टर. (नारायणगाव-ओझर-ओतूर-रस्ता राज्य महामार्ग क्र. १२८ कि.मी. ५५/० ते कि.मी. ७३/४०० लांबी ४०० कि.मी.) पी.एन. ३५ जि. पुणे
**(FP/MH/ROAD/45244/2020)**

संदर्भ : आपलेकडील पत्र क्र.सा.बां.उपवि-४/अशा/२१८, दि. १६/०६/२०२०.

विषयांकित प्रकरणी मौजे धालेवाडी तर्फ हवेली, ता-जुन्नर, जि.-पुणे येथील वनक्षेत्रातून ०.०९ हेक्टर वनक्षेत्र, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कलम-२ प्रमाणे सन १९८० पूर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदिकरणास परवानगी मिळणेबाबत आपला प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुट्या याप्रमाणे आहेत.

१. प्रस्तावात रस्त्याचे दोनही बाजूस केवळ साईड पट्टीसाठी दोनही बाजूस १.५ प्रमाणे एकुण ३.०० मीटर रस्ता रुंदीकरण प्रस्तावित केले आहे. तथापि रस्त्याची एकूण रुंदी स्पष्ट होत नाही. करीता रस्त्याचा काटछेद (Cross-Section) दर्शविणारा नकाशा प्रस्तावात जोडावा.

२. प्रमाणपत्र क्र. १९ मध्ये वृक्षतोडीची रक्कम भरण्यास तयार असलेबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

३. प्रमाणपत्र क्र. २८ व ४० नुसार ग्राम सभेचा ठराव व नाहरकत प्रमाणपत्र प्रस्तावात जोडावे.

४. प्रस्तावित रस्त्याने बाधित होणा-या वनक्षेत्राचा Geo-reffaranced नकाशा प्रस्तावात जोडावा.

वरीलप्रमाणे उपस्थित त्रुटींची पूर्तता करून फेर प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. जेणेकरून योग्य त्या शिफारशीसह प्रस्ताव मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करता येणे शक्य होईल.

19/06/2020

**(जयरामेगौडा आर)**
**उप वनसंरक्षक,**
**जुन्नर वनविभाग, जुन्नर.**

**प्रत-** वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर यांना माहिती साठी रवाना.

Raived letter Date 19/6/2020